# प्रकरण तिसरे

# कमवा व शिका योजनेची रयत शिक्षण संस्थेतील अंमलबजावणी

# प्रकरण - तिसरे

# कमवा व शिका योजनेची रयत शिक्षण संस्थेतील अंमलबजावणी

कर्मवीर भाऊराव पाटील हे खऱ्या अर्थाने शिक्षण महर्षी होते. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. हे ओळखून हजारो वर्षापासून ज्या बहुजन समाजाला शिक्षण मिळाले नव्हते, त्या बहुजन समाजाच्या चांद्रमौळी झोपडीपर्यंत ज्ञानांची गंगा पोहचविण्यासाठी शिक्षणाची पताका कर्मवीरांनी खेडोपाडी नेली. शिक्षण प्रसाराच्या कर्मवीरांच्या या कार्यात 'कमवा व शिका' योजनेचे स्थान महत्त्वाचे आहे. प्रस्तुत प्रकरणात रयत शिक्षण संस्थेची स्थापना, 'कमवा व शिका' योजना व कर्मवीरांचे तत्त्वज्ञान इत्यादीबाबत चर्चा करण्यात आलेली आहे.

**रयत शिक्षण संस्थेची स्थापना :**

बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी प्रयत्न करण्याचे महात्मा गांधींनी आवाहन करताच कर्मवीर भाऊराव पाटलांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. श्रमातून शिक्षण हे तत्त्वज्ञान राबवून ५ ऑक्टोबर, १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील 'काले' या गावी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करून रयत शिक्षण संस्थेची स्थापना कर्मवीरांनी केली.[१] पुढे त्यांनी सातारा जिल्ह्यातीलच 'नेर्ले' या गावी १९२१ मध्ये दुसरे वसतिगृह सुरू केले.[२] बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाच्या सुविधा सुलभतेने उपलब्ध व्हाव्यात यासाठी काले येथील वसतिगृहाचे सातारा या जिल्ह्याच्या ठिकाणी १९२४ मध्ये स्थलांतर करून संस्थेच्या मुख्य कार्यालयाची स्थापनाही सातारा येथे केली.[३] जून १९२४ पासून कर्मवीरांनी स्वत:च्या सोमवार पेठेतील राहत्या घरात नाना रामचंद्र माने, तुकाराम रामचंद्र माने, शंकर संभाजी कांबळे व बंडेन्द्र पायगौंडा पाटील या चार विद्यार्थ्यांची सोय करून वसतिगृह सुरू

केले.[४] पुढे धणिनिची बाग भाडेपट्टीवर घेतल्यानंतर वसतिगृह १९२७ मध्ये तेथे नेऊन त्याचे 'छत्रपती शाहू बोर्डिंग' असे नामकरण महात्मा गांधींच्या शुभहस्ते केले.[५] या बागेतील जमिनीत वसतिगृहातील मुले काम करून स्वत:चे शिक्षण पूर्ण करत असत. पुढे १९३७ साली शाहू बोर्डिंगला सर्टीफाईड स्कूल म्हणून मान्यता मिळाली.[६]

सन १९३५ च्या प्रारंभी भाऊरावांनी उत्तर भारताच्या केलेल्या दौऱ्यात प्रामुख्याने शांतीनिकेतन, नालंदा, आग्रा इत्यादी ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. स्वावलंबी तत्त्वावर चालणाऱ्या या काही संस्था होत्या. खेड्यातील मुलांच्या शिक्षणाचा यक्ष प्रश्न सोडविण्यासाठी अशाच प्रकारची व्यवस्था करण्याचे कर्मवीरांनी ठरविले. त्यानंतर २५ एप्रिल, १९३५ रोजी रयत शिक्षण संस्था, रजिस्टर करून स्वावलंबनाच्या तत्त्वावर सातारा व परिसरातील खेड्यापाड्यातून व्हालंटरी शाळांचे त्यांचे जाळेच विणले.[७] रयत शिक्षण संस्था रजिस्टर झाल्यावर संस्थेच्या घटनेप्रमाणे संस्थेच्या जनरल बॉडीची पहिली सभा १६ जून, १९३५ ला सातारा येथे पार पडली.[८] श्री. हमीदअली, जिल्हाधिकारी, सातारा यांची संस्थेचे पहिले अध्यक्ष म्हणून तर रा. रा. काळे व एम. बी. मुथा यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. तसेच एम. पी. मोहिते यांची संस्थेचे पहिले सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाली.[९] बहुजन समाजातील मुलांना स्वावलंबी आणि स्वाभिमानी शिक्षण देण्याच्या उद्देशाने कर्मवीरांनी १९४० मध्ये पहिले मोफत व वसतिगृहयुक्त 'महाराजा सयाजीराव विद्यालय' हे माध्यमिक विद्यालय सातारा येथे सुरू केले.[१०] या विद्यालयात सुरूवातीला ५५ विद्यार्थी होते. पुढील चार वर्षात ही संस्था ६४, ७९, ९२ आणि १२४ अशी वाढत गेली.[११] शारीरिक श्रमांवर आधारित शिक्षण, हा प्रयोग येथे कमालीचा यशस्वी झाला. १९४५ नंतर महाराजा सयाजीराव विद्यालयातून दरवर्षी २५ – ३० मुले बसून त्यापैकी ६० ते ७० टक्के मुले ही गुणवत्तेने पास होत होती. त्यांची बाहेरगावी उच्च शिक्षणाची सोय करणे कर्मवीरांना दिवसेंदिवस अवघड होवू लागले होते. त्यामुळे स्वत:चे कॉलेज काढणे जरूरीचे आहे हे जाणून या विद्यालयाच्या

धर्तीवरच छत्रपती शिवाजी कॉलेज या रयत शिक्षण संस्थेच्या पहिल्या मोफत व निवासी कॉलेजची स्थापना जून, १९४७ मध्ये सातारा येथे केली.[१२]

१९५० च्या दशकात शिक्षण हे अतिशय महाग तर होतेच पण त्यावर विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. पिढ्यान्–पिढ्या अज्ञान, अंधश्रद्धेने ग्रासलेल्या बहुजन समाजाला शिक्षणाचा गंधही नव्हता. त्यांच्यात शिकण्याची उमेद व जिद्द होती. पण अचूक मार्ग नव्हता या गरीब व हुशार मुलांना फी भरून अन् शहरात राहून शिक्षण घेणे शक्य नव्हते. ही मुले केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत व शिक्षणानंतरही त्यांच्यात शेती व इतर व्यवसायातही कष्ट करण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून कर्मवीरांनी छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये श्रमावर आधारित 'कमवा व शिका' योजना प्रथमपासूनच अंमलात आणली. अठरापगड जातीच्या विद्यार्थ्यांना एकाच छत्राखाली व एकाच स्वयंपाकगृहात सख्ख्या भावंडांप्रमाणे एकत्र नांदण्याची अभूतपूर्व दीक्षा देणाऱ्या कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमाने एक नवा माणूस घडविण्याची प्रेरणा महाराष्ट्राला दिली.

## 'कमवा व शिका' योजना आणि कर्मवीरांचे तत्त्वज्ञान :

रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेनंतर कर्मवीरांनी शिक्षण प्रसाराच्या कार्याला पूर्णपणे वाहून घेतले होते. कर्मवीर भाऊराव पाटील हे स्वावलंबी शिक्षणाचे पुरस्कर्ते हाते. गरीब समाजातील मुलांना शिक्षण द्यावयाचे आणि तेही मोफत द्यावयाचे तर स्वावलंबी शिक्षण हाच एक मंत्र आहे, असे कर्मवीरांचे मत होते. काम करून व निढळाचा घाम गाळून स्वावलंबनाने शिक्षण पूर्ण करण्याचा महान मूलमंत्र त्यांनी छत्रपती शिवाजी कॉलेजमधील 'कमवा व शिका' योजनेच्या माध्यमातून दिला. शिक्षण प्रसाराचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी हयातभर केले. त्यांच्या पश्चातही ते काम 'उणे न होता सदैव वाढतसे' असे आहे. याचे कारण म्हणजे या कामासाठी लागणारी माणसे त्यांनी निर्माण केली. "एका

वर्षासाठी तरतूद करायची असेल तर धान्य पेरा, दहा वर्षासाठी तरतूद करावयची असेल तर फळझाडे लावा आणि शंभर वर्षासाठी तरतूद करावयाची असेल तर माणसे निर्माण करा" अशा अर्थाची एक चिनी म्हण आहे. त्याच धर्तीवर कर्मवीरांनी केवळ शिक्षण देण्यासाठी नव्हे तर समाजाच्या सर्व थरात काम करण्यासाठी निष्ठावंत कार्यकर्ते निर्माण करण्याच्या ध्येयाने प्रेरित होवून महाराष्ट्राला आदर्श ठरेल अशी 'कमवा व शिका' योजना निर्माण केली.[१३]

शिक्षणातून मुलांनी स्वावलंबी बनले पाहिजे, यासाठी कर्मवीरांनी आपल्या संस्थेचे ब्रीदवाक्य 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' असेच ठेवले होते. शिक्षणातून विद्यार्थ्यांनी उच्च वर्गाचा मुखवटा पांघरून ग्रामीण समाजाशी आपले असणारे नाते तोडू नये यासाठी कर्मवीरांनी शिक्षणाबरोबरच श्रम करून स्वावलंबी झाले पाहिजे हे विद्यार्थ्यांना शिकविले. उच्च शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना काम करण्याची लाज वाटू लागते ही गोष्ट सत्यशोधक समाजाच्या जलशातून गावोगावी फिरत असताना कर्मवीरांच्या लक्षात आली होती. म्हणून शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या असीम त्यागाने व तत्त्वनिष्ठेने, वर्तमान आणि भविष्यकाळ यांचा समन्वय साधणारी तसेच त्याकाळी अत्यंत आवश्यक असणारी श्रमसंस्कारावर आधारित नवी शिक्षणप्रणाली निर्माण केली. तत्कालिन काळात बहुसंख्येने ग्रामीण भागात समाजाच्या दृष्टीने शिक्षण ही न परवडणारी गोष्ट होती. म्हणूनच गरीब समाजातील मुलांना शिक्षण देण्यासठी कर्मवीरांनी तोडगा काढला तो म्हणजे स्वावलंबनाचा. धणिनिच्या बागेत शाहू बोर्डिंग सुरू करण्यामागे व सरकारकडे चार भिंतीच्या डोंगराची मागणी करण्यामागे कर्मवीरांचा उद्देश असा होता की, विद्यार्थ्यांनी श्रम करून त्यांच्या गरजा भागविण्याइतके उत्पन्न काढावे. अशा प्रकारे कर्मवीरांनी 'कमवा व शिका' या योजनेद्वारे श्रममूल्यांवर आधारित नवीन शिक्षणाची परंपरा सुरू करून नवा समाज उभारण्यास सुरूवात केली.

मनाबरोबर शरीर पण कसदार बनावे या दृष्टीकोनातून कर्मवीरांनी छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अनेक होतकरू मुलांना श्रमाच्या मोबदल्यात शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. श्रमातून उत्पादन व उत्पादनाद्वारे स्वावलंबी शिक्षण देण्याची दृष्टी आणि खडक फोडून तेथे केळीच्या बागा फुलवायची कर्मवीरांची जिद्द होती. त्यातूनच त्यांनी शिक्षणाला जीवनाभिमूख बनविले. त्यांच्या योजनेचे साधे तत्त्वज्ञान म्हणजे 'घाम गाळल्याशिवाय दाम मिळत नाही' असे होते. म्हणून त्यांनी स्वाभिमान, स्वालंबन, स्वाध्याय व स्वातंत्र्य या चार तत्त्वांवर आपली ही शिक्षण योजना उभारली होती.[१४] मुलांना श्रमाची प्रतिष्ठा पटवून देवून, जातीभेद दूर सारून वसतिगृहयुक्त स्वावलंबी शिक्षणावर त्यांनी भर दिला. 'सत्य' व 'स्वावलंबन' यावर आधारलेली ही शिक्षण योजना समाजाच्या सर्वांगिण प्रगतीला पोषक ठरली. उच्च शिक्षणानंतरही विद्यार्थ्यांच्यात शेती व इतर व्यवसायातही कष्ट करण्याची तयारी होवून त्यांचा व्यक्तीमत्त्व विकास व्हावा या हेतूनेच त्यांनी 'कमवा व शिका' ही योजना सुरू केली. महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी कर्वे, राजर्षी शाहू महाराज इत्यादीपासून चालत आलेली महाराष्ट्राची थोर अशी शिक्षण परंपरा पुढे नेण्याचे काम कर्मवीरांनी केले.[१५]

कर्मवीर भाऊराव पाटील हे सार्वत्रिक शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे, सर्व प्रकारचे शिक्षण सर्वांना उपलब्ध झाले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी पालकांच्या पैशावर अवलंबून राहू नये, असेही कर्मवीर म्हणत असत. 'वार लावून जेवणे' किंवा 'माधुकरी मागणे' हे ही त्यांना पसंत नव्हते. काम करून स्वत:च्या हिंमतीवर स्वावलंबनाने शिक्षण पूर्ण करण्याचा महान मूलमंत्र कर्मवीरांनी या योजनेद्वारे समाजाला दिला.

'कमवा व शिका' ही योजना एकंदरीत शिक्षण व्यवस्थेमधील मैलाचा दगड ठरली आहे. कर्मवीरांनी शिक्षणात परिश्रमाला महत्त्व दिले. विद्यार्थ्यांनी स्वत:च्या हाताने काम केल्यामुळे त्यांच्या मनावर चांगला

परिणाम साधला जात असे. त्याचबरोबर कोणतेही काम हलके नसते ही भावना निर्माण करून जगण्याबद्दलचा उदंड आत्मविश्वास व कोणत्याही परिस्थितीशी टक्कर देण्याचं बळ कर्मवीरांनी या अभिनव प्रयोगातून विद्यार्थ्यांच्यात निर्माण केले.

"शिक्षणाने आदर्श माणूस घडवून नवीन समाजाची निर्मिती करता येते" हे कर्मवीरांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचे सार असून याच शिक्षणाला श्रमाची जोड देऊन त्यास एक नवीन दिशा दिली.

**रयत शिक्षण संस्थेतील 'छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा' येथे 'कमवा व शिका' योजनेची सुरूवात :**

कर्मवीर भाऊराव पाटलांनी सातारच्या ग्रामीण भागातील व्यवस्था करण्यासाठी सातारा येथील 'फलटण निवास' या जुन्या बंगल्यात छत्रपती शिवाजी कॉलेजची स्थापना केली. कॉलेजच्या स्थापनेबरोबरच येथे सयाजी हायस्कूलमधील उपक्रमावर आधारित 'कमवा व शिका' ही नवीन योजना सुरू केली.[१६] कॉलेजची जागा सातारा जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थाना पाठीमागे असल्याने हा परिसर शांत होता. परंतु तेथे असलेली उचं सखल जागा, माळरान यामुळे 'कमवा व शिका' या योजनेखालील सर्व विद्यार्थ्यांना येथे भरपूर काम मिळायचे. सपाटीकरण करणे, ताली बांधणे, उंचवटे खणणे, भराव करणे, आवाराची साफसफाई करणे, अनावश्यक झाडे—झुडपे काढणे इत्यादी कामे योजनेतील मुले करत असत.[१७] कॉलेजला लागूनच असलेल्या नाल्यात एक मोठी विहीर खणण्याचे कामही या योजनेतील विद्यार्थ्यांनी केले. ह्या विहीरीचे पाणी कॉलेज आवारात एक तलाव तयार करून त्यात सोडले.[१८] त्याचपद्धतीने गोडोलीतील जुन्या व कोरड्या तलावातील गाळ काढून तो चार भिंतीवरील जागेत पसरून केळीची बाग तयार करण्याचे कामही या विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आले.[१९] त्यांना ४ आणे तास याप्रमाणे दोन तास काम करणाऱ्यांना आठ आणे मिळत, तर आठ आणे संस्थेकडून मदत व आठ आणे लक्ष्मीबाई पाटील फंडातून बिनव्याजी कर्ज दिले जात असे. अशा

पद्धतीने योजनेतील विद्यार्थी स्वावलंबनाने स्वत:चा खर्च भागवित असत.[२०] शासनाची शिष्यवृत्ती मिळवणारे श्री. एम्. एन्. वसावे सारखे काही विद्यार्थी चार—चार तास कष्ट करून स्वत:चा खर्च भागवून शिष्यवृत्तीची रक्कम घरी आई—वडिलांना पाठवत असत.[२१]

कॉलेजमध्ये प्रथम वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जात होता. त्यामुळे कॉलेजची विद्यार्थी संख्या प्रथम कमीच होती. तरीही कर्मवीरांनी निभर्यपणे ही स्वावलंबी अशी 'कमवा व शिका' योजना निर्भयपणे राबविली. कालांतराने कॉलेजमध्ये वसतिगृहात न राहणाऱ्या स्थानिक मुलांनाही प्रवेश दिला गेला. ही मुले स्वेच्छेने श्रमाची कामे करत असत. अशा प्रकारे गरीब—श्रीमंत, जात—पात असा कोणताही भेदभाव न पाळता सर्व विद्यार्थी एकत्र येवून श्रम करत असत. हे या 'कमवा व शिका' योजनेचे वैशिष्ट्य होते.

**योजनेची कार्यप्रणाली :**

कर्मवीर भाऊराव पाटलांनी रयत शिक्षण संसथेच्या माध्यमातून बहुजन समाजाला ज्ञानार्जनासाठी स्वावलंबनाचा धडा दिला. कष्ट करण्याची तयारी असणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांसाठी कष्ट करून शिक्षण घेण्याची व्यवस्था असणारी 'कमवा व शिका' ही योजना छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अंमलात आणली. संस्थेच्या प्रारंभीच्या वाटचाली दरम्यान कर्मवीरांनी अनेक बड्या व्यक्तींना विनंती करून शाळेसाठी जागा आणि काम करण्यासाठी जमिनी मिळवून विद्यार्थ्यांना या कार्यक्षेत्रात गुंतवून ठेवले. छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने वसतिगृहात राहून नियमित श्रमाची कामे केली पाहिजेत, असा नियमच कर्मवीरांनी केलेला होता. त्यांची ही योजना यशस्वी होईल की नाही याबाबत काही व्यक्तींना शंका होती कारण ज्या मुलांनी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता त्यांना पूर्वी तशा प्रकारच्या कष्टाच्या कामाची सवय नव्हती. तरीही छत्रपती शिवाजी कॉलेज़ या उद्दिष्टानुसार पहिली चार वर्षे चालविले गेले.[२२] १९४७ ते १९५१ या पहिल्या चार वर्षात कॉलेजची विद्यार्थी संख्या अनुक्रमे १७,


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१८, ५५ आणि ७६ अशी होती.[२३] या विद्यार्थ्यांना कॉलेज शिक्षणासाठी कोणतीही फी भरावी लागत नव्हती. परंतु त्यांना रोज दोन तास श्रमाची कामे करावी लागत होती.[२४] अशा प्रकारे छत्रपती शिवाजी कॉलेजचे सर्व विद्यार्थी हे 'कमवा व शिका' या योजनेअंतर्गतच शिक्षण घेत होते. तत्कालिन मुंबई प्रांतातच नव्हे तर संपूर्ण देशात श्रमाच्या मोबदल्यात वसतिगृहयुक्त आणि मोफत स्वरूपात शिक्षण देणारे हेच एकमेव कॉलेज होते.[२५]

शारीरिक श्रमाची सक्ती व वसतिगृहात राहणे या कॉलेजच्या धोरणामुळे कॉलेजची विद्यार्थीसंख्या वाढू शकत नव्हती. तसेच अशा स्वरूपाची योजना चालविणाऱ्या छत्रपती शिवाजी कॉलेज चालविण्यासाठी १९४७ ते १९५१ या चार वर्षात १,९२,००० रूपयांचा तोटा संस्थेला सहन करावा लागला होता.[२६] शिवाय कॉलेज वसतिगृहयुक्त असल्याने स्थानिक विद्यार्थ्यांना त्याचा लाभ घेता येत नव्हता. कर्मवीरांनी बहुजन समाजाच्या मुलांसाठी काढलेल्या शाहू बोर्डिंगला सातारचे उच्चभ्रू लोक अस्पृश्यांचे बोर्डिंग असे म्हणत. त्यामुळे स्थानिक मुलांना प्रवेश खुला केल्यास उच्च वर्गातील मुलामुलींचाच जास्तीतजास्त फायदा होईल असे कर्मवीरांना वाटत होते. पण कार्यकर्त्यांचे म्हणणे असे होते की, संस्था व स्थानिक नागरिक यांच्यातील खूप दिवसांचा दूरावा हा स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यामुळे संपून सहकार्याचे वातावरण निर्माण होईल.[२७] शेवटी कर्मवीरांनी स्थानिक विद्यार्थ्यांकडून फी आकारणी करून त्यांना कॉलेजमध्ये प्रवेश देण्यास मान्यता दिली. तसा ठराव २१ मे, १९५१ ला संस्थेने मंजूर केला व जून, १९५१ पासून हा ठराव अंमलात आणला गेला.[२८] यामुळे स्थानिक मुलांच्या प्रामुख्याने मुलींच्या शिक्षणाची सोय झाली. तसेच कॉलेजला थोड्या प्रमाणात आर्थिक स्थैर्यही मिळाले. हा 'कमवा व शिका' योजनेत झालेला पहिला बदल होय. १९४९ ते १९५२ या चार वर्षात श्री. गो. हु. महाजन यांनी या योजनेचे प्रमुख म्हणून काम पाहिले.[२९] स्थानिक मुलांच्या प्रवेशाला कर्मवीरांनी होकार दिला, तरी मोफत शिक्षण पद्धती बंद करून ती आकारणे

त्यांना मनापासून पटत नव्हते. कारण कष्टाच्या मोबदल्यात गरीब मुलांना शिक्षण द्यायचे या त्यांच्या मूलभूत विचाराला धक्का पोहचल्याची त्यांची धारणा झाली होती. त्यामुळे इतर कॉलेजप्रमाणे आपले कॉलेज करण्यापेक्षा ते बंद करावे असाही विचार कर्मवीरांच्या मनात आला. पण कॉलेजचे तत्कालिन प्राचार्य ए. व्ही. मॅथ्यू यांनी कर्मवीरांच्या तत्त्वज्ञानाला अनुसरून 'कमवा व शिका' योजनेला शास्त्रशुद्ध स्वरूप दिले. कर्मवीरांनाही ते पसंत पडले. पुढे १९५२—५३ पासून जे विद्यार्थी या योजनेत सहभागी होवू इच्छितात त्यांच्यासाठी ही अभिनव योजना सुरू ठेवली.[३०]

कर्मवीरांनी जेव्हा वसतिगृहयुक्त कॉलेज सुरू केले, तेव्हा मूळ योजनेत सर्व विद्यार्थ्यांना रोज किमान दोन तास व सुट्टीदिवशी चार ते सहा तास श्रम करणे सक्तीचे होते. नवीन स्वरूपातील बदललेल्या योजनेमध्ये ज्या विद्यार्थ्यांना कॉलेजच्या फीचा किंवा वसतिगृहाचा खर्च करणे शक्य नाही, अशाच विद्यार्थ्यांपुरती ती मर्यादित करण्यात आली.[३१] त्याचप्रमाणे या योजनेसाठी लागणाऱ्या खर्चाच्या व्यवस्थेची जबाबदारी संस्थेवर न टाकता पूर्णपणे कॉलेजवरच टाकण्यात आली.[३२] कॉलेज फीची रक्कम भागविण्यासाठी विद्यार्थ्यांना खूप मोठ्या प्रमाणात कष्ट करणे आवश्यक होते. शिवाय काम करताना त्या विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता किती आहे, त्याला श्रम करून अभ्यासाला किती वेळ राहतो, तसेच मुलांना अशा प्रकारची कष्टाची कामे देण्याकरिता कॉलेजकडे असणारी मर्यादित व्यवस्था, करण्यासाठी तीन वेगवेगळ्या मार्गाचा एकत्रित विचार केला गेला. 'विद्यार्थ्याने स्वत:च्या श्रमातून १/३ रक्कम मिळवावी व त्यासाठी त्याला बाजारभावाने मोबदला दिला जावा, कॉलेजने त्याला १/३ रकमेइतकी फीची सवलत द्यावी आणि लक्ष्मीबाई पाटील स्मारक फंडातून त्याला १/३ रकमे इतकी कर्जावू शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था करावी.[३३] वरील विचारांना अनुसरून १९५३—५४ च्या कॉलेजच्या वार्षिक अंदाजपत्रकात योजनेसाठी २५०० रूपयांची तरतूद केली गेली.[३४] १९५३ मध्ये या योजनेचा फायदा ६१ विद्यार्थ्यांनी घेतला.[३५] १९५४—५५ पासून छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये

'कमवा व शिका' योजना अधिक परिणामकारकपणे अंमलात आणली गेली.[३६] त्याचप्रमाणे त्यावेळी असेही ठरले की, शारीरिक श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना साताऱ्यात रोजगारीवर काम करणाऱ्या कामगारांना जेवढी मजूरी दिली जाते तेवढे पैसे दिले जावेत, त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रत्येक तासाला तीन आणे याप्रमाणे मोबदला देण्याचे ठरले.[३७] तसेच जो विद्यार्थी मजूरी म्हणून तीन रूपयांची कमाई करेल त्याला सौ. लक्ष्मीबाई पाटील कर्जावू शिष्यवृत्ती निधीतून तीन रूपयेचे कर्ज दिले जाई. हे कर्ज त्यांनी शिक्षण पूर्ण झाल्यावर परत करावे अशी अपेक्षा होती. परंतु ते कर्ज फेडलेच पाहिजे असे कायदेशीर बंधन त्या विद्यार्थ्यावर नव्हते.[३८] या योजनेत सुरूवातीला २० मुलांनी सहभाग घेतला.[३९] उत्तरोत्तर विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली. योजनेतील मुले सकाळी दोन तास व संध्याकाळी दोन तास असे एकूण चार तास काम करत असत. त्या विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर व अभ्यासावर परिणाम होवू लागल्याचे निदर्शनास आल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यास दोन तासापेक्षा अधिक काम देवून नये असे ठरले, मात्र सुट्टीदिवशी मुलांना जादा दोन तास काम करण्याची संधी दिली जात असे.[४०] या योजनेद्वारे शारीरिक श्रमाचे कामे करून विद्यार्थ्यांनी किमान आपल्या फी एवढी रक्कम मिळवावी हा एकमेव उद्देश होता.

कॉलेज सुरू असताना विद्यार्थ्यांना श्रमदानासाठी जास्त वेळ देणे शक्य नसे, त्यामुळे योजनेतील काही विद्यार्थी दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुट्टीत घरी न जाता होस्टेलवर राहून आपल्या फी बरोबरच राहण्याचा व जेवणाचा खर्चही भागवत असत. १९५४ मध्ये अशी २५ मुले दिवाळीला घरी न जाता कामासाठी होस्टेलवर राहिली होती. अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी १२ ऑक्टोबर १९५४ ला लक्ष्मीबाई स्मारक फंडातून त्या सर्व विद्यार्थ्यांचा सुट्टीतला एक महिन्याचा जेवण खर्च करण्याचे कर्मवीरांनी ठरविले.[४१] कॉलेजमध्ये १९५३–५४ मध्ये योजनेचा फायदा अनुक्रमे ६१ व १०० विद्यार्थ्यांनी घेतला. तर १९५७ मध्ये १४६ विद्यार्थ्यांनी या योजनेत सहभाग घेतला.[४२] वसतिगृहात राहणारी सर्व मुले

या योजनेत सहभागी होत होती. परंतु वसतिगृहात न रहाणारी काही मुलेही या योजनेत सहभागी होत होती. मात्र अशा विद्यार्थ्यांना कर्जावू शिष्यवृत्तीची सवलत दिली जात नसे.[४३] योजनेत सहभागी होणाऱ्या मुलांच्यात जातीवरून भेदभाव केला जात नसे. ज्याची शारीरिक श्रम करण्याची तयारी आहे अशा कोणत्याही विद्यार्थ्याला योजनेत प्रवेश नाकारला जात नव्हता. महाराष्ट्राच्या विविध भागातून हे विद्यार्थी शिक्षणासाठी येत होते. योजनेतील विद्यार्थी शेती, पशुपालनाव्यतिरिक्त पी.डब्ल्यु.डी. कडून खडी पुरवण्याचे कंत्राट मिळाल्यावर खडी फोडण्याचे कामही करत होते. नंतर कॉलेज इमारतीच्या बांधकामासाठी खडी फोडणे, पक्क्या विटा तयार करणे, गवंड्याच्या हाताखाली काम करणे अशा प्रकारची कामेही योजनेतील मुले करत होती.[४४] 'कचकून खा व दणकून काम करा' असा कर्मवीरांचा विचार योजनेतील विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षणतज्ज्ञांनाही मोलाचा वाटतो.[४५] योजनेतील विद्यार्थ्यांना दिवसातून दोन वेळा जेवण दिले जात असे. चहा किंवा नाष्टा त्यांना दिला जात नसे. योजनेतील विद्यार्थ्यांना शारीरिक श्रमाची कामे करावी लागत असल्यामुळे त्यांचे आरोग्यही चांगल्या प्रकारे सुदृढ बनत असे.[४६] या योजनेतून कॉलेजला पैसे मिळत नाहीत. उलट कधी कधी कॉलेजलाच योजनेसाठी काही रकमेची तरतूद करावी लागली आहे. तरीही ही योजना मोठ्या आत्मियतेने राबविली जात आहे. कारण कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता बहुजन समाजातील गरीब विद्यार्थ्यांसाठी श्रमावर आधारित शिक्षण देणारी अशी ही आगळी वेगळी योजना आहे.

गेल्या काही वर्षातील योजनेतील विद्यार्थ्यांची संख्या[४७]

| सन | विद्यार्थी संख्या | सन | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १९९१ — ९२ | ५४ | १९९६ — ९७ | ६२ |
| १९९२ — ९३ | ६४ | १९९७ — ९८ | ४५ |
| १९९३ — ९४ | ५७ | १९९८ — ९९ | ४९ |
| १९९४ — ९५ | ७६ | १९९९ — २००० | ६८ |
| १९९५ — ९६ | ५७ | २००० — २००१ | ७१ |

## 'कमवा व शिका' योजनेचे कार्यक्षेत्र :

'कमवा व शिका' ही एक क्रांतीकारी योजना आहे. या योजनेत कॉलेजमध्ये ११ वी पासून एम्.ए. करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश खुला आहे. सुरूवातीला योजनेतील मुले कॉलेजच्या शेतीत काम करत असत. त्याचबरोबर जमिनीचे सपाटीकरण करणे, विहीर खोदणे, खडी फोडणे इत्यादी स्वरूपाची कामे करत होती. परंतु काळानुरूप योजनेच्या कार्यपद्धतीत विविध कार्यक्षेत्रांची भर पडलेली आहे. सध्या या योजनेत मुलींचाही सहभाग आढळतो. योजनेतील मुले दररोज पाच तास ठरवून दिलेली कामे करतात. त्या मोबदल्यात त्यांच्या शिक्षणाबरोबर भोजन व निवासाची सोय केली जाते व वर्षाला दोन ड्रेस दिले जातात.[४८]

## योजनेचे कार्यक्षेत्र पुढीलप्रमाणे —

### १) शेती विभाग :

सातारच्या कॅम्प परिसरात सातारा नगरपरिषदेची एक बाग आहे. तिचा त्या काळी करमणूकीसाठी वापर होत होता. १९५२ मध्ये तिथे असणारा मिल्ट्री कॅम्प बेळगावला स्थलांतरीत झाल्यामुळे ती बाग ओस पडलेली होती.[४९] या बागेचे असणारे १३ एकराचे क्षेत्र कॉलेजने १५०० रूपये खंडाने खरेदी केले.[५०] तसेच १९७० मध्ये वर्ये येथे कॉलेजने ९ एकर जमीन खरेदी केली.[५१] अशा प्रकारे सध्या योजनेअंतर्गत २२ एकर शेतीयोग्य जमिन कॉलेजकडे उपलब्ध आहे. नगरपरिषदेच्या बागेतील जमिनीत केळी, आंबा, जांभूळ, चिंच अशी फळझाडे आहेत. येथील शेतीतून खरिप हंगामात हायब्रीड, भुईमूग, मका, सोयाबिन तसेच कडधान्याचे उत्पादन घेतले जाते. तर रब्बी हंगामात गहू, शाळू, हरभरा ही पिके घेतली जातात. हे सर्व धान्य प्रामुख्याने योजनेतील विद्यार्थ्यांच्या होस्टेलमध्ये वापरले जाते.[५२] विद्यार्थ्यांतर्फे येथील शेतीत नवनवीन प्रयोगाअंतर्गत शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठीही प्रयत्न केले जातात. अशाच एका प्रयत्नाअंतर्गत कोकण कृषी विद्यापीठ व डॉ. भाभा अणुशक्ती केंद्र, तुर्भे यांच्या सहकार्याने उपट्या जातीच्या भुईमूगावर ग्यामा किरणाद्वारे

संकरीत केलेले टी.के.जी. १९५ (काजू शेंग) हे उन्हाळी भुईमुगाचे ब्रीडर सीड घेवून फाऊंडेशन बियाण्याचा एक एकराचा आदर्श प्लॉट १९९३–९४ मध्ये योजनेतील मुलांनी घेतला होता.[५३] शेतीतील पेरणीपासून खुरपणी, मळणी इत्यादी कामे योजनेतील विद्यार्थीच करतात.

## २) पशुपालन विभाग :

पशुपालन विभाग हा शेती विभागाला पूरक असा विभाग आहे. या विभागात योजनेची बैल जोडी आहे. अनेक दुभती जनावरे आहेत. त्याचपद्धतीने काही भाकड गाईही आहेत. त्यांना केवळ भूतदया म्हणून पाळले जाते. प्रारंभी अशा भाकड गायी परदेशी नावाचा एक इसम कसायाकडून सोडवून योजनेसाठी कॉलेजला देत असे. त्यापैकी काही गायींपासून उत्तम जातीचे खोंडही मिळाल्यामुळे योजनेला याचा फायदाच झाला आहे.[५४] या सर्व जनावरांना चरावयास नेणे, वैरण घालणे, दुभत्या जनावरांच्या धारा काढणे, पाणी दाखवणे, शेण काढणे इत्यादी सर्व प्रकारची कामे योजनेतील मुलेच करतात. विभागातील पशूंची योग्य प्रकारे निगा कशी राखावी यासाठी तज्ञांचेही मार्गदर्शन घेतले जाते.[५५] या विभागाअंतर्गत योजनेकडे मोठ्या प्रमाणात पशूधन उपलब्ध आहे. पशुधनाची वर्गवारी खालीलप्रमाणे[५६]

| अ.नं. | प्राण्यांचा प्रकार | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | जातीवंत बैल | २ |
| २ | खोंड | २ |
| ३ | पंढरपूरी म्हैशी | १ |
| ४ | जाफराबादी म्हैशी | ३ |
| ५ | देशी गाई | ५ |
| ६ | संकरित गाई | २ |
| ७ | लहान कालवडी | २ |
| ८ | लहान रेड्या | २ |
| ९ | शेळ्या | ४४ |
| | एकूण | ६३ |

## ३) डेअरी विभाग :

डेअरी विभाग हा पशुपालन विभागाला पुरक असा विभाग आहे. याची स्थापना १९६५ साली झाली. पशुपालन विभागाकडून मिळणाऱ्या दूधाचा संचय या विभागातर्फे करून त्याचे कॅन्टीन विभाग, मेस विभाग येथे गरजेप्रमाणे वितरण करून उरलेल्या दूधाची विक्री केली जाते. येणारे उत्पन्न योजनेअंतर्गत कॉलेजमध्ये जमा केले जाते. ही सर्व कामे विद्यार्थीच करतात.[५७]

## ४) भाजीपाला विभाग :

भाजीपाला विभाग हा शेती विभागाशी निगडीत असा आहे. नगरपरिषद बाग क्षेत्रात एक विहीर आहे. या विहीरीच्या पाण्यावर बारमाही भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते. या बाग क्षेत्रात भाजीपाल्यासाठी राखीव ठेवलेले असे क्षेत्र आहे. त्यामध्ये मेथी, पालक, शापू इत्यादी पालेभाज्यांबरोबरच टोमॅटो, कारली, दोडके, गवार, भेंडी, कोबी, फ्लॉवर, अशा विविध प्रकारच्या फळभाज्याही घेतल्या जातात.[५८] भाजीपाल्याची लागण काढणी व बाजारात विक्री ही सर्व कामे योजनेतील मुलेच करतात.

## ५) मळणी यंत्र विभाग :

योजनेचे स्वत:चे असे मळणी यंत्र आहे. याद्वारे धान्याच्या सुगीच्या दिवसात ज्वारी, सोयाबीन इत्यादीची मळणी केली जाते. त्याचबरोबर ही सेवा परिसरातील शेतकऱ्यांनाही उपलब्ध करून दिली जाते. यातूनही योजनेसाठी उत्पन्न मिळविले जाते.[५९]

## ६) पीठाची गिरणी :

या योजनेअंतर्गत एक पिठाची गिरणीही चालविली जाते. ही गिरण दररोज सायंकाळी ४ ते ९ या वेळेत चालविली जाते. गिरणीमध्ये एका वेळी जास्तीत जास्त ३ विद्यार्थी ठरवून दिलेल्या वेळेप्रमाणे गिरणी चालविण्याचे काम करतात. या गिरणीमध्ये वसतिगृहातील धान्याबरोबरच

परिसरातील लोकांचीही धान्ये दळून दिली जातात. त्याद्वारेही योजनेसाठी उत्पन्न मिळविले जाते.[६०]

### ७) कॅन्टीन विभाग :

या योजनेअंतर्गत चालविले जाणारे कॅन्टीन हे जुलै १९९१ मध्ये सुरू केलेले आहे. यापासून योजनेला उत्पन्नही भरपूर मिळते. प्रथम चार कॅन्टीन या योजनेकडून चालविली जात होती. सध्या योजनेमार्फत छत्रपती शिवाजी कॉलेज परिसरातील एक कॅन्टीन चालविले जाते.[६१] या कॅन्टीन विभागात मुलेच माल खरेदी करतात. त्याचप्रमाणे येथे अल्पोपहाराचे वडा, पुरी भाजी, चिवडा, भजी, चहा, कॉफी इत्यादी पदार्थ बनविले जातात. विभागाचे कामकाज पाहण्यासाठी चेअरमन शिवाय कॅन्टीन कमिटी आहे. येथील ऑर्डर देणे, भांडी घासणे व कॅशिअरचे कामही विद्यार्थीच करतात. येथे दैनंदिन कामकाजासाठी कुपन पद्धतीचा वापर केला जातो. दररोजचा हिशोब कॅन्टीन कमिटीकडे सादर केला जातो.[६२] हा एक अत्यंत यशस्वी होत असलेला उपक्रम आहे.

### ८) इस्त्री केंद्र :

या विभागात मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहात दोन इस्त्री केंद्रे आहेत. येथे होस्टेलच्या विद्यार्थ्यांच्या कपड्यांना सवलतीच्या दरात इस्त्री करून देण्याचे काम विद्यार्थी करतात. ही सवलत बाहेरच्या व्यक्तीनाही दिली जाते. या दोन्ही केंद्रातून चांगले उत्पन्न योजनेला मिळते.[६३]

### ९) रसपानगृह :

हा योजनेअंतर्गत चालविला जाणारा हंगामी विभाग आहे. फेब्रुवारी ते मे या उन्हाळ्याच्या दिवसात हे रसपानगृह चालविले जाते. ऊस रसाबरोबरच इतर प्रसिद्ध कंपनीची शीत पेये विक्रीस ठेवली जातात. या विभागासाठी योजनेने स्वतंत्र असा फ्रीज घेतलेला आहे.[६४]

### १०) टेलिफोन बूथ :

हा योजनेअंतर्गत चालविला जाणारा स्वतंत्र विभाग आहे. कॉलेज प्रवेशद्वाराजवळ एस्.टी.डी., आय.एस्.डी. व पी.सी.ओ. ची

व्यवस्था असणारे कॉलेजचे सुसज्य असे टेलिफोन सेवा केंद्र आहे. कॉलेजचे विद्यार्थी व बाहेरचे लोकही या सेवेचा लाभ घेतात. सकाळी ८ ते सायंकाळी ८ पर्यंत हे केंद्र चालू असते. येथील सर्व व्यवस्था विद्यार्थी बघतात. ते नेमून दिलेल्या ठराविक वेळात आळीपाळीने या विभागाचे काम पाहतात.[६५]

**११) ग्रंथालय विभाग :**

या विभागाअंतर्गत योजनेतील मुले ग्रंथालयात मदतनीस म्हणून काम पाहतात. ग्रंथालयातील पुस्तके व्यवस्थित क्रमाने वितरीत करून जागच्या जागी पुन्हा ठेवणे, जुन्या पुस्तकांचे वर्गीकरण करणे, नवीन पुस्तकांची व्यवस्थित मांडणी करणे अशा प्रकारची कामे विद्यार्थी करतात. त्याचबरोबर कॉलेजमध्ये असणाऱ्या स्वतंत्र अभ्यासिका कक्षात नियंत्रक म्हणूनही काम पाहतात.[६६]

**१२) स्पर्धा परीक्षा विभाग :**

छत्रपती शिवाजी कॉलेज,यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स व धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी कॉलेजमध्ये १९९५–९६ पासून स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू आहे.[६७] या केंद्राचे व्यवस्थापन व केंद्राचे असणारे स्वतंत्र ग्रंथालय याची व्यवस्था पाहण्याचे कामही योजनेतील विद्यार्थी करतात.[६८]

**१३) संस्था व्यवस्थापन :**

रयत शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यालय हे सातारा येथे आहे. या संस्था ऑफिसमध्ये योजनेतील मुले लेखनिक, कॉम्प्युटर ऑपरेटर यांचे मदतनीस म्हणून कामासाठी योजनेतील मुले पाठविली जातात.[६९]

**१४) अन्यक्षेत्रातील कामे :**

'कमवा व शिका' योजनेच्या या कार्यक्षेत्राशिवाय योजनेतील मुलांना कॉलेज परिसराच्या बाहेर खाजगी कामासाठीही पाठविले जाते. बागकाम, परिसर स्वच्छता, घरांची रंगरंगोटी इत्यादी कामासाठी सेवानिवृत्त आजीव सेवक, सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या घरी तसेच इतरत्र बाहेरही

मागणीप्रमाणे योजनेतील मुले सध्या तासाला पंधरा रूपये याप्रमाणे पाठविली जातात.[७०] वनीकरणाचा कार्यक्रमही योजनेतील मुलांनी राबविलेला आहे. १९८५–८६ सालात कॉलेज परिसरात निलगिरी, अशोक, डाळींब, पेरू, सुबाभूळ, नारळ अशा विविध प्रकारची १५०० झाडे लावली होती.[७१] काही वेळा दिवाळीला योजनेतील मुले फटाका स्टॉलही चालवितात.[७२] वरील सर्व उपक्रमाद्वारे मिळालेले उत्पन्न, आलेला खर्च व फायदा खालीलप्रमाणे—

| वर्ष | उत्पन्न रूपये | खर्च रूपये | निव्वळ नफा रू. | निव्वळ तोटा रू. |
|---|---|---|---|---|
| १९९१—९२ | १,२६,८२६.३५ | १,१०,४७६.७० | १६,३४९.६५ | —— |
| १९९२—९३ | २,७२,७५३.९० | २,०४,६०७.५० | ६८,१४६.४० | —— |
| १९९३—९४ | २,११,९८३.२० | ३,१५,६६०.२५ | —— | १,०३,६७७.०५ |
| १९९४—९५ | १,४३,३६६ | ३,२१,६४३ | —— | १,७८,२७७ |
| १९९५—९६ | २,५३,४३३.१५ | २,३३,४१६.३० | २०,०१६.८५ | —— |
| १९९६—९७ | १,८१,५५३ | १,७२,५७२ | ८,९८१ | —— |
| १९९७—९८ | २,३६,१८२ | २,५१,२८८ | —— | १५,१०६ |
| १९९८—९९ | ४,३५,५९० | ३,०४,८५६ | —— | १,३०,७३४ |
| १९९९—२००० | ५,३९,४५६ | ७,८३,९६२ | —— | २,४४,५०६ |
| २०००—२००१ | ६,२०,९५८ | ८,७५,२३४ | —— | २,५४,२७६ |

भांडवली खर्च वजा जाता.[७३]

अशा प्रकारची ही अभिनव योजना आहे. या योजनेविषयी काही शिक्षणतज्ञांनी कर्मवीरांना सुचविले होते की, हुशार मुलांना श्रम योजनेतून वेगळे करून खास शिकवण्या लावा जेणेकरून ही मुले पुढे संस्थेचे नाव काढतील. परंतु कर्मवीरांनी यास नकार दिला; कारण श्रम करणारे व श्रम न करणारे असे दोन गट विद्यार्थ्यांच्यात पडून श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे विद्यार्थी कमी लेखतील आणि त्यामुळे श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देऊन सामाजिक विषमता नष्ट करणाऱ्या या योजनेचे अस्तित्वच नाहीसे होईल असे कर्मवीरांचे म्हणणे होते. प्रत्येक विद्यार्थ्याने काम केलेच

पाहिजे असा त्यांचा नियम होता. काही वेळेला एखादा पालक त्यांच्याकडे येवून त्यांना जादा पैसे देवून आपल्या मुलास काम करायला लावू नका असे सांगत. तेव्हा कर्मवीर म्हणत, "एवढा लाडका असेल तर घरी घेवून जा, श्रमात सवलत नाही" यावरूनच कर्मवीरांचा श्रम प्रतिष्ठेवर असलेला विश्वास दिसून येतो.[७४]

१९५६ च्या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात कर्मवीरांनी भाग घेतला होता. तरीही योजनेतील मुलांकडे त्यांचे बारीक लक्ष होते. छत्रपती शिवाजी कॉलेजचा एक विद्यार्थी एम्. एम्. स्वामी इंग्रजी विषय घेवून बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात पास झाला होता. त्याला बनारस हिंदु विद्यापीठात पुढे शिकण्याची संधी मिळाली. पण त्याची वार्धक्याने थकलेली आई उंब्रज जवळील शिवडे या गावी एकटीच राहत असल्याने त्या मुलास आईची काळजी वाटत होती. तेव्हा कर्मवीरांनी दरमहा १५ रूपये त्याच्या आईस पाठविण्याची व्यवस्था केली. त्यामुळे तो विद्यार्थी अगदी निश्चिंत मनाने बनारसला जावू शकला. पुढे त्याच विद्यार्थ्याने प्राध्यापक, प्राचार्य व आजीव सेवक या नात्याने संस्थेची सेवा केली आहे.[७५] अशा प्रकारे कर्मवीरांचे योजनेत शिकणाऱ्या मुलांविषयीचे प्रेम दिसून येते.

फेब्रुवारी, १९५२ मध्ये अमेरिकेतील प्रसिद्ध शिक्षणतज्ञ प्रा. कोप भारत भेटीस आले असता, त्यांनी सातारा येथे संस्थेला व छत्रपती शिवाजी कॉलेजला भेट दिली होती.[७६] त्यावेळी त्यांनी असे उद्गार काढले होते की, 'कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या महान शैक्षणिक कार्याचा विस्तार पाहून शिक्षण तज्ञ म्हणून असणारी माझी ऐटही काहीशी कमी झाली आहे. या ठिकाणी गरीब—श्रीमंत, स्पृश्य—अस्पृश्य असा कोणताही भेदभाव न मानता सर्वजण एकाच पातळीवर आहेत. मानवी संघर्षाचे बीज मूळातून काढून टाकण्याचा हा एक प्रयत्न आहे.'[७७] या कामासाठी कर्मवीरांना जितकी डॉलर्स मदत हवी असेल तितकी अमेरिकेतून मिळवून देण्याचे त्यांनी आश्वासन दिले होते. त्यावर कर्मवीरांनी नम्रपणे कोणतीही मदत नको असल्याचे सांगून मुलांनी फोडून ठेवलेल्या खडीकडे बोट दाखवून ते

म्हणाले, "These are heaps of my dollors"[७८] तसेच कर्मवीरांनी संस्थेचे माजी विद्यार्थी बॅरिस्टर पी. जी. पाटील यांच्या म्हणण्यानुसार "LABORARE EST ORARE" हे लॅटिन भाषेतील शब्द छत्रपती शिवाजी कॉलेजचे घोषवाक्य म्हणून स्वीकारले.[७९] या शब्दाचा अर्थ 'Work is worship' किंवा 'श्रम हीच पूजा' असा होता. कोणतेही काम हलके नसते. समोर येणारे प्रत्येक काम निरपेक्ष वृत्तीने करून श्रमाचा आदर करणे हेच या योजनेचे तत्त्व होते.[८०] यावरून 'कमवा व शिका' या योजनेची शारीरिक श्रमाविषयीची आस्था दिसून येते.

छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये येणारे नामवंत पाहुणे या स्वावलंबी योजनेस आवर्जून भेट देतात. यामध्ये प्रामुख्याने क्रांतिसिंह नाना पाटील, बाबु जगजीवनराम, प्र. के. अत्रे, भाऊसाहेब नलवडे, मुल्लासाहेब, बॅरिस्टर माने, अभिनेत्री स्नेहलता प्रधान, बंडो गोपाळा मुकादम, बाबुराव सणस, गणपतराव शेडगे, बापूसो भापकर, आझाद हिंद सेनेचे कर्नल जगन्नाथ भोसले, एस. एम. जोशी, यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, शरद पवार यांचा समावेश आहे.[८१]

संस्थेला लाभलेले बरेच प्राध्यापक, प्राचार्य या योजनेद्वारे शिकलेले आहेत. नगरहून सातारला आलेले (१९५५—५६) माजी प्राचार्य शिवाजीराव भोर हे या स्वावलंबी योजनेद्वारे शिकलेले होते. वसतिगृहात स्वयंपाक करणे, शेतीत काम करणे त्याचबरोबर खडी फोडण्याचेही काम त्यांनी केले.[८२] तसेच छत्रपती शिवाजी कॉलेजचे माजी प्राचार्य आर. डी. गायकवाड हे स्वत: या योजनेचे माजी विद्यार्थी होते. त्यांनी प्राचार्य झाल्यावर योजनेतील मुलांकडे जातीने लक्ष दिले होते. वर्ये येथील सात — आठ एकर शेतीची बांध बंदिस्ती केली, सहा — सात एकर मुरमाड शेतीत बाहेरून आणून काळी माती भरली. तसेच दोन एकरात पालशेतहून हापूस आंबा रोपे आणून लावली. १०' X १०' X ५' असे ३ हौद बांधून त्यात कॅनॉलचे पाणी साठवून पाण्याची सोय केली. तेथील शेतीवर १५ गाई घेवून त्यांच्यासाठी गोठा बांधला. शेतातून वाहणाऱ्या ओढ्यावर बंधारा

बांधून ५०० सागवानाची रोपे लावली. त्यासाठी तीन लाख रूपये खर्च आलेला खर्च स्कीमच्या उत्पन्नातून केला.[८३]

संस्थेचे सेवानिवृत्त आजीव सदस्य बी. जी. शेवाळे हे छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये १९५४ साली योजनेचे विद्यार्थी होते. त्यांनी योजनेअंतर्गत धणिनिच्या बागेतील ऊस, हळदीच्या शेतात काम करणे, चार भिंतीवरील टेकडीचे सपाटीकरण करणे, गवंड्याच्या हाताखाली काम करणे, स्विमिंग टँक खोदाई, वाळूचे ट्रक भरणे व मोकळे करणे इत्यादी स्वरूपाची कामे केली होती.[८४] तसेच भारती विद्यापीठाचे संस्थापक व सध्याचे सहकार मंत्री श्री. पतंगराव कदम हे देखील कॉलेजच्या या योजनेचे माजी विद्यार्थी आहेत.[८५]

'कमवा व शिका' या योजनेमध्ये शिकून ज्यांनी शून्यातून विश्व निर्माण करून समाजाच्या विविध क्षेत्रात मोलचे योगदान दिलेले आहे अशा काही व्यक्तींची नावे प्राचार्य डॉ. सूर्यवंशी, प्राचार्य एम. एम. स्वामी, प्राचार्य भगरे, प्राचार्य आर. डी. गायकवाड, प्राचार्य व. न. इंगळे, प्राचार्य बी. डी. महादार, प्राचार्य शिंदे, प्राचार्य पवार, प्राचार्य संकपाळ, प्रा. ॲड. के. व्ही. पाटील, प्रा. शिवाजी जंगम, डॉ. ए. ए. पाटील, बी. जी. शेवाळे, ज्ञानदेव गोरे, वसंत माने, एन. डी. थोरात, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. आर. एच. भोसले, प्रा. विजय रणदिवे, डॉ. एस. पी. शिंदे, प्रा. सुकुमार शेटे अशी आहेत.[८६] अशा प्रकारच्या या अभिनव योजनेची छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा ही प्रयोग शाळाच आहे.

## रयत शिक्षण संस्थेच्या इतर शाखांकतील 'कमवा व शिका' योजनेची अंमलबजावणी :

छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे 'कमवा व शिका' योजनेची अगदी यशस्वीपणे अंमलबजावणी झाली होती. त्यामुळे कर्मवीरांनी संस्थेच्या इतर शाखांतही हा प्रयोग राबविण्याचे ठरविले. त्यानुसार संस्थेचे दुसरे कॉलेज १९५४ मध्ये कर्मवीरांनी कराड येथे सुरू केले.[८७] तेथे त्यांनी सुरूवातीपासूनच 'कमवा व शिका' योजना चालू केली.

१९५३ ते १९६० या केवळ सात वर्षात सातारा आणि कराड येथील या योजनेचा एकूण १०३४ विद्यार्थ्यांनी फायदा घेतला.[८८] हे सर्व विद्यार्थी सोलापूर, कोल्हापूर, नगर, सातारा, सांगली, खानदेश यासारख्या महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून आलेले होते. त्याचप्रमाणे कर्मवीरांनी देवापूर, ता. खटाव येथे १९५४ साली १० एकर जमीन वसतिगृहासाठी आणि १५ एकर जमीन तेथील हायस्कूलसाठी शासनाकडून मिळविली होती.[८९] त्याचप्रमाणे १९५६ साली 'कमवा व शिका' या योजनेतील विद्यार्थ्यांना काम मिळावे यासाठी आणखी २५ एकर जमीन सरकारकडून मिळविली होती.[९०] तसेच महाराष्ट्र सरकारने राजेवाडी तलावातील आणखी ७५ एकर जमीन १९५९ साली संस्थेला नाममात्र खंडाने दिली.[९१] आजही या जमिनी संस्थेच्या ताब्यात आहेत. तेथे आजही योजनेतील विद्यार्थी शेतीत काम करून आपले शिक्षण पूर्ण करत आहेत. आज रयत शिक्षण संस्थेतील छत्रपती शिवाजी कॉलेज शिवाय धनंजयराव गाडगीळ कॉलेज, सातारा, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा, आण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, इत्यादी १२ शाखांत ही 'कमवा व शिका' योजना सुरू आहे.[९२]

अशा प्रकारे श्रमप्रतिष्ठेवर चालविली जाणारी एक आदर्श शिक्षण योजना आहे. श्रमाचा सन्मान करण्याची ही कल्पनाच मुळात अर्थपूर्ण आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी स्वत:च्या हाताने कष्ट करायला लागल्यामुळे त्यांच्या मनावर चांगला परिणाम साधला गेला आहे. तसेच कोणतेही काम मोठे नसते किंवा हलके—सलके नसते ही भावनाही त्यांच्या मनात निर्माण झाली. जगण्याबद्दलचा उदंड आत्मविश्वास, कोणत्याही परिस्थितीशी टक्कर देण्याचं बळ, स्वाभिमान, स्वावलंबन ही जीवनमूल्ये या अभिनव प्रयोगातून समाजाला मिळाली आहेत.

**संदर्भ :**


१) रयत शिक्षण पत्रिका, १९९७, रयत शिक्षण संस्थेचा अमृत महोत्सवी सोहळा, पृष्ठ — १.

२) ठोके बा. म., मला समजलेले कर्मवीर भाऊराव पाटील, पृष्ठ — ३७.

३) कित्ता, पृष्ठ — ४७.

४) कित्ता, पृष्ठ — ४७.

५) पाटील अजित, कर्मवीरायण (पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील), पृष्ठ — ८७.

६) रयत शिक्षण पत्रिका, १९९७, रयत शिक्षण संस्थेचा अमृत महोत्सवी सोहळा, पृष्ठ — १.

७) ठोके बा. म., उपरोक्त, पृष्ठ — ३६.

८) कित्ता, पृष्ठ — ९६.

९) काटकर मा. भि., प्रबोधनाची धगधगती मशाल, प्रथमावृत्ती, १९८९, पृष्ठ — ७०.

१०) मॅथ्यू ए. व्ही., मराठी अनुवाद वाळिंबे वि. स., कर्मवीर भाऊराव पाटील, १९८८, पृष्ठ — २३.

११) कित्ता, पृष्ठ — २२१.

१२) ठोके बा. म., उपरोक्त, पृष्ठ — १६३.

१३) रयत शिक्षण पत्रिका, १९९७, रयत शिक्षण संस्थेचा अमृत महोत्सवी सोहळा, प्रा. मगदूम लेख, पृष्ठ — ४१.

१४) डॉ. पाटील विमला, डॉ. पाटील शिवाजी, वटवृक्ष, चंद्रकिरण प्रकाशन, पृष्ठ — २५.

१५) मोरे अरविंद, शिक्षण महर्षी कर्मवीरांच्या कथा, सरस्वती प्रकाशन, पृष्ठ — ३७.

१६) मुलाखत : प्राचार्य डॉ. सुर्यवंशी एस्. आर. दि. २७/८/२००८.

१७) कित्ता

१८) शिवगौरव, सुवर्ण महोत्सवी अंक, १९९६ — १९९७, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा. पृष्ठ — ३२

१९) कित्ता, पृष्ठ — ३२.

२०) कित्ता, पृष्ठ — ३२.

२१) कित्ता, पृष्ठ — ३२.

२२) डॉ. मॅथ्यू ए. व्ही., उपरोक्त, पृष्ठ — २००.

२३) ठोके बा. म., उपरोक्त, पृष्ठ — १८१.

२४) कित्ता, पृष्ठ — १८१.

२५) कित्ता, पृष्ठ — १८१.

२६) Dr. Kadiyal R. A., Karmaveer Bhaurao Patil – His Contribution to Education in Maharashtra, P. 267.

२७) Ibid, P. 267 .

२८) Ibid, P. 268

२९) शिवगौरव, उपरोक्त, पृष्ठ — ३२.

३०) Dr. Kadiyal R. A., Karmaveer Bhaurao Patil – His Contribution to Education in Maharashtra, P. 269.

३१) Ibid, P. 269.

३२) Ibid, P. 269.

३३) Ibid, P. 269.

३४) डॉ. मॅथ्यू ए. व्ही., उपरोक्त, पृष्ठ — २०१.

३५) ठोके बा. म., उपरोक्त, पृष्ठ — २३२.

३६) प्राचार्य गायकवाड आर. डी., 'छत्रपती शिवाजी कॉलेज, शाखा इतिहास पुस्तिका', पृष्ठ — ७.

३७) डॉ. मॅथ्यू ए. व्ही., उपरोक्त, पृष्ठ — २०१.

३८) कित्ता, पृष्ठ — २०१.

३९) कित्ता, पृष्ठ — २०१.

४०) कित्ता, पृष्ठ — २०२.

४१) ठोके बा. म., उपरोक्त, पृष्ठ — २३३.

४२) कित्ता, पृष्ठ — २३२.

४३) मुलाखत : प्राचार्य डॉ. गायकवाड आर. डी., दि. २७/८/२००८

४४) कित्ता

४५) मुलाखत : प्राचार्य डॉ. सुर्यवंशी एस. आर., दि. २७/८/२००८

४६) कित्ता

४७) मुलाखत : प्रा. देशमुख एस्. एम., रेक्टर, कमवा व शिका योजना छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, दि. ११/७/२००८.

४८) कित्ता

४९) मुलाखत : प्रा. जाधव व्ही. एस्., दि. १४/७/२००८.

५०) कित्ता

५१) मुलाखत : प्रा. डॉ. शिंदे एस्. पी., दि. २१/७/२००८.

५२) कित्ता

५३) मुलाखत : प्रा. देशमुख एस. एम., रेक्टर, कमवा व शिका योजना छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा दि. ११/७/२००८.

५४) मुलाखत : प्राचार्य गायकवाड आर. डी., दि. २७/८/२००८.

५५) मुलाखत : बाबर प्रविण गुलाबराव, एम.ए. १., दि. १३/९/२००८.

५६) मुलाखत : पोरे शहाजी बजरंग, एम.ए. २., दि. १३/९/२००८.

५७) मुलाखत : प्राचार्य गायकवाड आर. डी., दि. २७/८/२००८.

५८) मुलाखत : जगताप लक्ष्मण प्रभाकर, बारावी., दि. १३/९/२००८.

५९) मुलाखत : जाधव अमोल विठ्ठल, अकरावी., दि. १३/९/२००८.

६०) मुलाखत : वाघमोडे दिलीप भिमराव, एफ.वाय.बी.ए., दि. १३/९/२००८.

६१) मुलाखत : लेंडवे महेश बापूराव, अकरावी, दि. १३/९/२००८.

६२) मुलाखत : टिंगरे नंदकुमार सदाशिव, एफ.वाय.बी.ए., दि. १३/९/२००८.

६३) मुलाखत : डोंगरे सागर सुरेश, एफ.वाय.बी.ए., दि. १६/९/२००८.

६४) मुलाखत : जाधव सुर्यकांत मारूती, एस.वाय.बी.ए., दि. १३/९/२००८.

६५) मुलाखत : घनवट दत्तत्रेय कुंडलिक, बारावी, दि. १३/९/२००८.

६६) मुलाखत : बिचितकर सचिन दत्तत्रेय, एस.वाय.बी.ए., दि.१३/९/२००८.

६७) अमृत महोत्सव स्मरणिका, १९९५, रयत शिक्षण संस्था, डॉ. अनिल पाटील, पृष्ठ — १९.

६८) मुलाखत : काळे विजय मारूती, एम.ए. २, दि. १३/९/२००८.

६९) मुलाखत : मस्के राहूल विठ्ठल, एफ.वाय.बी.ए., दि. १३/९/२००८.

७०) मुलाखत : नरळे महादेव पांडुरंग, एम.ए. २, दि. १३/९/२००८.

७१) मुलाखत : प्राचार्य गायकवाड आर. डी., दि. २७/८/२००८.

७२) मुलाखत : पवार सचिन बाळू, बी.ए. १, दि. १३/९/२००८.

७३) मुलाखत : प्रा. देशमुख एस्. एम., रेक्टर, कमवा व शिका योजना छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, दि. ११/७/२००८.

७४) काटकर मा. भि., उपरोक्त, पृष्ठ — ९४.

७५) मुलाखत : खराडे रामेश्वर परशुराम, अकरावी दि. १३/९/२००८.

७६) ठोके बा. म., उपरोक्त, पृष्ठ — २३६.

७७) कित्ता, पृष्ठ — २३६, १३७.

७८) कित्ता, पृष्ठ — २३७.

७९) रिपोर्ट ऑफ दि शिवाजी कॉलेज (१९४७—६३), पृष्ठ — २३.

८०) मुलाखत : प्रा. डॉ. सौ. चव्हाण सुनंदा, दि. २/९/२००८.

८१) मुलाखत : प्रा. जाधव पोपटराव, दि. १२/८/२००८.

८२) मुलाखत : प्रा. कदम बी. आर., दि. २६/७/२००८.

८३) शिवगौरव, उपरोक्त, पृष्ठ — ७३.

८४) कित्ता, पृष्ठ — ९७.

८५) मुलाखत : प्राचार्य जाधव जे. जी., दि. २५/९/२००८.

८६) मुलाखत : प्रा. शेटे सुकुमार, दि. ३/१०/२००८.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

८७) Dr. Kadiyal R. A., Karmaveer Bhaurao Patil. His Contribution to Education in Maharashtra, P. 272.

८८) ठोके बा. म., उपरोक्त, पृष्ठ — २३२.

८९) कित्ता, पृष्ठ — २२३.

९०) कित्ता, पृष्ठ — २२३.

९१) कित्ता, पृष्ठ — २२४.

९२) Pawar B. G., Father of Rural Education – Karmaveer Bhaurao Patil – 1987, P. 87.